ज.भ.शि.प्र.मंडळाचे,

# कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,

शिवाजीनगर, गढी.

## बी.ए.व्दितीय वर्षे - पेपर - VI

## विषय :- दृक- श्राव्य माध्यमांसाठी लेखन कौशल्य


प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे (सहाय्यक प्राध्यापक)

मराठी विभाग

**नभोवाणी :-** नभोवाणी हे मनोरंजनाचे व माहितीसाठीचे श्राव्य माध्यम आहे. तसेच देशाच्या कानाकोप-यात माहिती पाठविण्याचे , लोकशिक्षण करण्याचे एक प्रभावी संप्रेषण माध्यम आहे. लोकसंस्कृती , लोककला प्रादेशिक भाषांतील विविध वाङ्मयीन आविष्काराचे संवर्धन करण्याचे ही एक महत्वाचे माध्यम आहे.

भारतात 'नभोवाणी ' प्रसारण माध्यमाचा आरंभ 1926 मध्ये झाला. 1947 पर्यंत भारतात दिल्ली, कलकत्ता, मुंबई , मद्रास इ. ठिकाणी प्रसारण केंद्रे होती. नभोवाणी चे नंतर 'आकाशवाणी ' असे नामकरण करण्यात आले.त्याचे माध्यम 'रेडिओ' हे होते. तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी या प्रसारमाध्यमाचे महत्व लक्षात घेऊन स्वतंत्र अशा नभोवाणी खात्याची निर्मिती केली. त्यामुळे देशाच्या कानाकोप-यात रेडिओ ध्वनी लहरी पोहचवून संदेश देण्याचे व मनोरंजन करण्याचे कार्य सुरु झाले.

सध्या 200 च्यावर आकाशवाणी प्रसारण केंद्रे आहेत. नभोवाणी केंद्रामार्फत देशांतर्गत 18 भाषांमधून 68 बातमीपत्रे प्रसारित केली जातात.





❖प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे (सहाय्यक प्राध्यापक) मराठी विभाग

# माध्यमाचे वर्गीकरण

मुद्रित

इलेक्ट्रॉनिक माध्यम

नव इलेक्ट्रॉनिक

माध्यम

वृत्तपत्रे , ग्रंथ, नियतकालिक इ.

उपग्रह आणि संगणक

प्रणाली (इंटरनंट)

श्राव्य माध्यम

दृकश्राव्य माध्यम

नभोवाणी,दूरध्वनी, टेपरेकॉर्डर इ.

दूरदर्शन, चित्रपट, व्हिडिओ इ.

❖प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे (सहाय्यक प्राध्यापक) मराठी विभाग

# नभोवाणीचे कार्यक्रमाचे स्वरुप

नभोवाणी  हे श्राव्य माध्यम आहे. कार्यक्रम ऐकणारा श्रोतावर्ग वेगवेगळया प्रकारचा असतो. त्यामुळे कार्यक्रमाचे स्वरुप ही वेगवेगळे असते. समाजात विविध लोकांचा सामाजिक स्तर, वयोगट लक्षात घेऊन नभोवाणीच्या कार्यक्रमात वैविध्य व वैपुल्य असते. कार्यक्रमाचे आयोजन करताना श्रोत्याच्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक,शैक्षणिक स्तराचे भान ठेवावे लागते.

1. यामध्ये ध्वनीला सर्वाधिक महत्व असते
2. यातील शब्दांचा उच्चार स्पष्ट असावा लागतो.
3. आवाज मधुर व हळूवार असावा लागतो.
4. शब्दफेक प्रभावी असावी लागते.
5. भाषा सोपी असावी लागते.
6. नादमयता व लय असलेला आवाज आवश्यक असतो.



**नभोवाणीचे कार्य** -आकाशवाणी हे मनोरंजनाचे व माहितीसाठीचे श्राव्य माध्यम आहे

**‘बहुजन हिताय ,बहुजन सुखाय’ हे नभोवाणीचे ब्रीदवाक्य असून लोकरंजनातून लोकशिक्षण हे तिचे प्रमुख कार्य आहे. भारतासारख्या खंडप्राय देशात प्रांत, भाषा, रीतीरिवाज वेगवेगळे आहेत म्हणून कार्यक्रमाचे आयोजन करताना श्रोत्याच्या स्तराचे भान ठेवावे लागते.**



❖प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे (सहाय्यक प्राध्यापक) मराठी विभाग

# नभोवाणी संप्रेषण

नभोवाणी संप्रेषण म्हणजे नभोवाणीच्या माध्यमातून केला जाणारा संवाद किंवा संप्रेषण व्यवहार होय. नभोवाणीवरून प्रसारित होणा-या कार्यक्रमातून माहिती, ज्ञान, विचार यांचे अप्रत्यक्षपणे संप्रेषण होत असते.त्यामुळे परस्पर-संबंध विकसित होतात. नभोवाणीवरील शैक्षणिक, सांस्कृतीक, सामाजिक कार्यक्रमाद्वारे इतरांचे विचार आपणास समजावून घेता येतात. एखाद्या विचाराची तार्किक आणि भावनिक अशा दोन्ही बाजू समजावून घेता येतात. अनुभव, आकलन, निष्कर्ष, तात्पर्य अशा अनेक पाय-या नभावाणीवरील श्रवणाद्वारे गाठता येतात. नभोवाणी संप्रेषणात श्रवण, संभाषण, वाचन आणि लेखन ही चार कौशल्य महत्वाची आहेत. उत्तम श्रवणामुळे आपली सकारात्मकता, सक्रियता वाढते. श्रवण कौशल्य हे संप्रेषणात पायाभूत व महत्वाचे मानले जाते.




❖प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे (सहाय्यक प्राध्यापक) मराठी विभाग

# नभोवाणीवरील भाषण

नभावाणीवरील भाषण  हे अनौपचारिक असते.तसेच ते पूर्वनियोजित  असते. त्यामुळे ते आधी लिहून काढावे लागते. हे भाषण वक्त्याला नभोवाणीवरुन वाचून दाखवायचे असते. मोजक्या वेळेत मुद्देसुद बोलावे लागते.मुळ विषयाला हात घालून श्रोत्यांचे लक्ष वेधून घ्यावे लागते.

1. नभोवाणीवरील भाषणाची भाषा साधी, सोपी असावी लागते.
2. भाषणाचा विषय हा श्रोत्यांची मानसिक, बौध्दिक कुवत लक्षात घेऊन निवडावा लागतो.
3. नभोवाणीवरील भाषण मुद्देसूद आणि मोजक्या शब्दांत आकर्षक पध्दतीने असावे.
4. नभोवाणीवरील भाषणात व,वा, पेक्षा आणि असे शब्द वापरावेत.
5. नभोवाणीवरील भाषणात लोकजीवनात प्रचलित असलेल्या वाक्प्रचारांचा व म्हणींचा वापर करावा.





❖प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे (सहाय्यक प्राध्यापक) मराठी विभाग

## नभोवाणीवरील चर्चा

नभावाणीवरील चर्चेमध्ये दोन किंवा अधिक तज्ज्ञ घेण्यात येतात. चर्चेत भाग घेणा-या तज्ज्ञांव्यतिरिक्त चर्चेचे संचालन करण्यासाठी एखादा संचालक असतो.त्याची भूमिका सूत्रधाराप्रमाणे फारच महत्वाची असते. चर्चा नियोजित आराखडयाप्रमाणे चालवणे हे त्याचे काम असते. चर्चा कोठे अडली तर ती पुढे नेणे, चर्चेचे तारू भरकटू लागले तर ते पुन्हा योग्य मार्गावर आणणे, चर्चेतून एखादा महत्वाचा मुद्दा निसटून जात नाही ना याची काळजी घेण ही जबाबदारी संचालकाची असते. त्यासाठी संचलन करणारी व्यक्ती ही बहुश्रुत, हजरजबाबी व प्रसंगावधनी असावी लागते.संचलन करणा-या व्यक्तीला विषयाचा आवाका माहित असणे आवश्यक असते. चर्चेत सहभाबी तज्ज्ञ, संचालक व नभोवाणीवरील कार्यक्रम-अधिकारी यांनी एकत्र बसून चर्चेचा आराखडा निश्चित करावा लागतो.



❖प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे

(सहाय्यक प्राध्यापक) मराठी विभाग

# नभोवाणीवरील मुलाखत

मुलाखत ही त्या व्यक्तीला समजून घेण्याचे चांगले माध्यम आहे.नभावाणीवर महत्वाच्या व्यक्तीच्या मुलाखती घेतल्या जातात. त्यामुळे काही गोष्ट्ची काळजी घ्यावी लागते.

1.ज्यांची मुलाखत घ्यायची त्या व्यक्तीच्या कार्या विषयी जास्तीत जास्त माहिती असणे आवश्यक आहे.

2. मुलाखत घेणा-याने मुलाखतीच्यावेळी अचूक प्रस्तावना करणे, ठरलेल्या प्रश्नांची उत्तरे आटोपशीर शब्दांत काढून घेणे, बोलण्यात अनौपचारिकता आणणे व नियोजित वेळेत कार्यक्रमाची सांगता करणे

3.मुलाखत घेणा-याने कमी बोलणे आणि मुलाखत कर्त्याला नेमक्या शब्दात प्रश्न विचारुन त्याची मते, विचार श्रोत्यापर्यंत पोहचविणे.

4. मुलाखतीच्यावेळी प्रश्नोत्तराची भाषा आपल्या नेहमीच्या बोलण्यातली असावी ज्यामुळे त्यात मोकळेपणा व जिव्हाळा निर्माण होईल.

5. नभोवाणीवरील मुलाखत दहा ते पंधरा मिनिटाची असते. त्यामुळे त्यात श्रोत्यांचे अवधान टिकून राहिल याचे भान ठेवावे लागते.



❖प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे

(सहाय्यक प्राध्यापक) मराठी विभाग

# नभोवाणीवरील बातमीपत्रे

वर्तमान पत्रातील बातम्या आणि नभोवाणीवरील बातम्या यामध्ये फरक आहे.कारण वृतपत्र हे मुद्रित व वाचनीय माध्यम आहे तर नभोवाणी हे श्राव्य माध्यम आहे. त्यामुळे या दोन्ही माध्यमाव्दारे प्रसारित होणा-या बातम्यांचे स्वरूप वेगवेगळे असते.




1. बातमी लेखनाची भाषा सोपी असावी.
2. बातमी सांगतांना स्थळ, दिनांक यांचा उल्लेख असावा.
3. दोन बातम्यांतील उच्चार व विश्राम यात वेळ असावा.
4. संख्या, आकडेवारी सांगतांना टप्या- टप्याने ती सांगितली पाहिजे.
5. नभोवाणीच्या बातम्यांना योग्य निवेदनाची व चांगल्या आवाजाच्या निवेदकाची जोड दिलेली असते.



## नभोवाणीची भाषा व शैली

नभावाणीवरील बोलण्याची किंवा भाषणाची शैली म्हणजे वक्त्याचे व्यक्तिमत्व प्रतिबिंबित करणारा जणू आरसाच असतो.त्यामुळे बोलत असताना ऐकणार-या  श्रोत्यांना नीरस, रुक्ष वाटणार नाही याची काळजी घ्यावी लागते.

1. नभोवाणीवरील भाषा ही दैनंदिन वापरातील असावी.
2. श्रोत्यांच्या मनाला भावणारी छोटी छोटी वाक्य असावीत.
3. विषय कितीही अवघड  असला तरी सोप्या व परिचित शब्दामध्येच मांडावा लागतो.
4. भाषा ही अवघड, कृत्रिम व  अलंकारिक वाक्यरचना  असू नये.

❖प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे (सहाय्यक प्राध्यापक) मराठी विभाग



# धन्यवाद . . .



❖प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे (सहाय्यक प्राध्यापक) मराठी विभाग